# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांकः01.02.2026** **वारः रविवार**

---

<u>**ठळक बातम्या**</u>

**<u>- अर्थमंत्री निर्मला सीतारामन आज लोकसभेत २०२६-२७ या वर्षासाठीचा केंद्रीय अर्थसंकल्प सादर करणार.</u>**

**<u>- द्वितीय भारत-अरब परराष्ट्र मंत्र्यांच्या बैठकीत परस्पर हिताच्या मुद्द्यांवर चर्चा; प्रादेशिक शांतता आणि स्थिरतेमध्ये अरब लीगच्या भूमिकेचे पंतप्रधानांद्वारे कौतुक.</u>**

**<u>- ऑस्ट्रेलियन खुल्या टेनिस स्पर्धेत महिला एकेरीमध्ये एलेना रिबाकिना अजिंक्य.</u>**

**<u>आणि</u>**

**<u>- न्यूझीलंडविरुद्ध वीस षटकांच्या मालिकेत भारताचा 4-1 असा विजय.</u>**

आता सविस्तर बातम्या

**<u>अंदाजपत्रक</u>**
अर्थमंत्री निर्मला सीतारामन आज लोकसभेत २०२६-२७ या वर्षासाठीचा केंद्रीय अर्थसंकल्प सादर करतील. लोकसभेत अर्थसंकल्प सादर केल्यानंतर, राज्यसभेत अर्थसंकल्पाची प्रत सादर केली जाईल. वर्तमान केंद्र सरकारच्या तिसऱ्या कार्यकाळातील हा त्यांच्याद्वारे सादर केला जाणारा तिसरा अर्थसंकल्प असेल. अर्थसंकल्प तयार करण्यापूर्वी, अर्थमंत्र्यांनी विविध भागधारकांसोबत सल्लामसलत बैठका घेतल्या. कृषी मंत्री शिवराज सिंह चौहान यांनी कृषी आणि ग्रामीण विकासाशी संबंधित विविध पैलूंवर व्यापक अर्थसंकल्पपूर्व सल्लामसलत देखील केली आणि सूचनांचा संकलित अहवाल अर्थमंत्र्यांना सादर केला.

अर्थमंत्री निर्मला सीतारामन सलग नवव्यांदा संसदेत केंद्रीय अर्थसंकल्प सादर करतील. त्यांनी २०१९ मध्ये पदभार स्वीकारला. आपल्या अर्थसंकल्पीय भाषणात, त्या पुढील आर्थिक वर्षासाठी आर्थिक विकासाचा आराखडा तसंच सरकारच्या उत्पन्न आणि खर्चाचा तपशील सादर करतील. अर्थसंकल्प तयार करण्याच्या प्रक्रियेदरम्यान, केंद्र सरकारनं विविध माध्यमातून तरुणांसह नागरिकांकडून सूचना मागवल्या होत्या, २०२६-२७ च्या केंद्रीय अर्थसंकल्पात त्या प्रतिबिंबित होतील. अर्थसंकल्पीय भाषण पूर्ण झाल्यानंतर, अर्थसंकल्पाशी संबंधित सर्व कागदपत्रं केंद्रीय अर्थसंकल्पीय मोबाइल ॲप आणि वेबसाइटवर उपलब्ध असतील. अर्थसंकल्पीय सादरीकरणानंतर, अर्थमंत्री देशाच्या विविध भागातील सुमारे 30 महाविद्यालयीन विद्यार्थ्यांशी संवाद साधतील. 28 जानेवारी रोजी राष्ट्रपतींच्या अभिभाषणानं सुरू झालेलं अर्थसंकल्पीय अधिवेशन 2 एप्रिलपर्यंत सुरू राहील.

**<u>भारत-अरब</u>**
परराष्ट्र मंत्री एस. जयशंकर यांनी दहशतवादाप्रती शून्य सहनशीलतेचं धोरण भक्कम आणि सार्वत्रिक आदर्श असलं पाहिजे असं म्हटलं आहे. नवी दिल्ली इथं द्वितीय भारत-अरब परराष्ट्र मंत्र्यांच्या बैठकीत डॉक्टर जयशंकर यांनी सांगितले की सर्व प्रकारच्या दहशतवादामुळं भारत आणि अरब देशांना धोका निर्माण होतो. त्यांनी भारत आणि सर्व अरब लीग देशांमधील भक्कम ऐतिहासिक भागीदारीवर भर देताना नमूद केलं की ही बैठक जागतिक व्यवस्थेत मोठे बदल होत आहेत, राजकारण, अर्थव्यवस्था, तंत्रज्ञान आणि लोकसंख्याशास्त्र यासारखे घटक महत्त्वाची भूमिका बजावत आहेत, अशावेळी होत आहे. पश्चिम आशियातील परिस्थितीबद्दल बोलताना त्यांनी सांगितलं की गेल्या वर्षभरात या प्रदेशाचं स्वरूप वेगानं बदलले असून त्याचा भारत आणि अरब देशांवर परिणाम होत आहे. त्यांनी गाझामधील शांतता योजना पुढे नेणं हे आंतरराष्ट्रीय समुदायासाठी सामायिक प्राधान्य असल्याचं सांगितलं.

यापूर्वी, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी अरब देशांचे परराष्ट्र मंत्री, अरब लीगचे सरचिटणीस आणि अरब देशांच्या शिष्टमंडळांशी भेट घेतली. पंतप्रधानांनी भारत आणि अरब जगतातील लोकांमधील खोल आणि ऐतिहासिक संबंधांवर भर दिला. व्यापार आणि गुंतवणूक, ऊर्जा, तंत्रज्ञान, आरोग्य आणि इतर महत्त्वाच्या क्षेत्रांमध्ये सहकार्य आणखी वाढवण्याची भारताची वचनबद्धता मोदी यांनी व्यक्त केली. पंतप्रधानांनी पॅलेस्टिनी जनतेला भारताच्या सतत पाठिंब्याचा पुनरुच्चार केला आणि गाझा शांतता योजनेसह शांतता प्रयत्नांचं स्वागत केलं.

**<u>मोदीपंजाब</u>**

पंतप्रधान नरेंद्र मोदी आज संत गुरु रविदासजी यांच्या ६४९ व्या जयंतीनिमित्त पंजाबमधील जालंधरला भेट देणार आहेत. डेरा सचखंड बल्लान इथं आदरांजली वाहिल्यानंतर मोदी संत गुरु रविदासजी यांच्या सन्मानार्थ आयोजित सार्वजनिक कार्यक्रमात सहभागी होणार आहेत. जालंधरजवळील आदमपूर विमानतळावर उतरल्यानंतर, या विमानतळाचे 'श्री गुरु रविदासजी विमानतळ, आदमपूर' असे नवीन नाव असलेल्या नामफलकाचे अनावरण मोदी यांच्या हस्ते होणार आहे. त्याचबरोबर पंतप्रधानानांच्या हस्ते लुधियानामधील हलवारा विमानतळाच्या टर्मिनल इमारतीचेही आभासी पद्धतीने उद्घाटन करणार आहेत.

हे राष्ट्रीय बातमीपत्र आकाशवाणीच्या पुणे केंद्रावरुन देण्यात येत आहे....

**<u>उद्घाटन</u>**

महाराष्ट्रामध्ये, नाशिक जिल्ह्यात त्रिंबकेश्वर इथल्या प्रशासकीय इमारतीचं आणि दर्शन रांग मंडपाचं उद्घाटन काल केंद्रिय सांस्कृतिक आणि पर्यटन मंत्री गजेंद्रसिंग शेखावत यांच्या हस्ते झालं. आगामी कुंभमेळ्याच्या अनुषंगानं नाशिक आणि त्रिंबकेश्वर इथं सुरू असलेले प्रकल्प लवकरात लवकर पूर्ण केले जातील असं सांगून या प्रकल्पांमुळे भाविकांना आणि पर्यटकांना उत्तम सुविधा मिळतील असा विश्वास शेखावत यांनी व्यक्त केला. हे विकास प्रकल्प केवळ सुशोभीकरणापुरते मर्यादित न ठेवता रस्ते, पिण्याचे पाणी, स्वच्छता आणि वाहतूक व्यवस्थापन या आवश्यक गरजांवरही भर देण्यात येईल असं त्यांनी सांगितलं. समाजात समता, बंधुता आणि सदाचार यांचं बीज रोवण्याचं काम निवृत्तिनाथांनी केल्याचे गौरवोद्गार त्यांनी काढले. पर्यटन मंत्रालयानं प्रसाद योजनेअंतर्गत निवृत्ती महाराज आश्रम परिसरात ही इमारत बांधली आहे.
दरम्यान, रामकुंडाच्या काठावर झालेल्या या सोहळ्यात'रामतीर्थ गोदा प्राच्य विद्याप्रकाश राष्ट्रीय पुरस्कार' केंद्रीय पर्यावरणमंत्री गजेंद्रसिंह शेखावत यांच्या हस्ते कर्नाटकातील धारवाड इथले वेदमूर्ती पंडित राजेश्वरशास्त्री जोशी यांना प्रदान करण्यात आला. १ लाख रुपये, चांदीचा कुंभ, गोदावरी मातेची मूर्ती, सन्मानचिन्ह आणि पगडी असं या पुरस्काराचं स्वरूप होतं. ज्येष्ठ कृषितज्ज्ञ पद्मश्री पुरस्काराने सन्मानित सुभाष शर्मा यांना 'रामतीर्थ गोदा राष्ट्रीय जीवन पुरस्कार' देऊन गौरविण्यात आलं. अडीच लाख रुपये, गोदावरी मातेची मूर्ती, चांदीचा कुंभ आणि सन्मानपत्र असं या पुरस्काराचं स्वरूप होतं.

**<u>रामसर</u>**

उत्तर प्रदेशातील एटा जिल्ह्यातील पटना पक्षी अभयारण्य आणि गुजरातच्या कच्छ जिल्ह्यातील छारी-धंद यांचा भारताच्या रामसर स्थळांमध्ये समावेश करण्यात आला आहे. पर्यावरण, वन आणि हवामान बदल मंत्री भूपेंद्र यादव यांनी काल याबाबत घोषणा केली. ते म्हणाले की, या दोन्ही पाणथळ जागी शेकडो स्थलांतरित आणि स्थानिक पक्ष्यांच्या प्रजातींना अधिवास उपलब्ध आहे. हे परिसर धोक्यात आलेल्या पक्ष्यांव्यतिरिक्त चिंकारा, लांडगे, कॅराकल, वाळवंटी मांजरी आणि वाळवंटी कोल्ह्यांसारख्या वन्यजीवांचंही निवासस्थान आहेत.

**<u>तटरक्षकदल</u>**

भारतीय तटरक्षक दल आज आपला ५० वा स्थापना दिवस साजरा करत आहे, आजच्याच दिवशी १९७७ मध्ये केवळ सात सागरी जहाजांसह भारतीय तटरक्षक दलाची स्थापना करण्यात आली होती. आज मात्र या दलाची १५५ जहाजे आणि ८० विमानांचा समावेश असलेल्या एका बलाढ्य सागरी शक्तीमध्ये उत्क्रांती झाली आहे. तटरक्षक दल २०३० पर्यंत २०० सागरी जहाजे आणि १०० विमानांचे आपले लक्ष्यित सामर्थ्य गाठण्याच्या दिशेने मार्गक्रमण करत आहे. केंद्रीय गृहमंत्री अमित शाह आणि लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांनी भारतीय तटरक्षक दलाच्या जवानांना त्यांच्या स्थापना दिनानिमित्त शुभेच्छा दिल्या आहेत.

**<u>सेल-स्पर्धा</u>**

पोलाद मंत्रालयाच्या अंतर्गत असलेली महारत्न सार्वजनिक क्षेत्रातील कंपनी, स्टील अथॉरिटी ऑफ इंडिया लिमिटेडनं MyGov च्या सहकार्याने 'SAIL-e-BRATION: Steel Built India, SAIL Built Trust' नावाची देशव्यापी सर्जनशील स्पर्धा सुरू केली आहे. या स्पर्धेत देशवासीयांना आकर्षक रील्स, चित्रपटसमान कथा आणि माहितीपूर्ण डिजिटल जाहिरातींद्वारे त्यांची कथाकथनाची प्रतिभा दाखवण्याची संधी आहे. या मोहिमेचा उद्देश प्रत्येक भारतीयाच्या दैनंदिन जीवनात सेलच्या अविभाज्य भूमिकेवर प्रकाश टाकणे हा आहे असं एका निवेदनात, पोलाद मंत्रालयाने सांगितलं. भारतातील सर्जनशील प्रतिभेला प्रोत्साहन देण्यासाठी आणि पुरस्कृत करण्याकरिता, पहिल्या ५ निर्मात्यांना प्रत्येकी १० हजार रुपयांचं रोख पारितोषिक दिलं जाईल. प्रत्येक भारतीय नागरिक या स्पर्धेत भाग घेऊ शकतो. सर्व प्रवेशिका १६ फेब्रुवारीपर्यंत सादर करणं आवश्यक आहे. अधिक माहितीसाठी, स्पर्धक www.mygov.in या संकेतस्थळाला भेट देऊ शकतात.

**बलोच**

बलुचिस्तान लिबरेशन आर्मीनं संपूर्ण बलुचिस्तानमध्ये 'ऑपरेशन हेरॉफ'च्या दुसऱ्या टप्प्याच्या सुरुवातीची घोषणा केली आहे. ही निर्णायक प्रतिकाराची घोषणा असल्याचं सांगून, बीएलएचे प्रवक्ते जियांद बलोच यांनी एका संक्षिप्त निवेदनात सांगितलं की, हा नवीन टप्पा कब्जा करणाऱ्या राज्याविरुद्ध आणि त्याच्या सर्व लष्करी आणि प्रशासकीय संरचनांविरुद्ध आहे.

बलुचिस्तानचे लोक सध्या पाकिस्तानपासून स्वातंत्र्य मिळवण्यासाठी लढत आहेत. बलुचिस्तानच्या विविध मानवाधिकार संघटनांनी या प्रांतातील पाकिस्तानी सैन्याच्या दडपशाहीवर वेळोवेळी आवाज उठवला आहे. यामध्ये बलोच नेते आणि नागरिकांच्या घरावर हिंसक छापे, बेकायदेशीर अटक, सक्तीनं नाहीसं करणे, 'मारा आणि मृतदेह फेकून द्या' धोरण आणि बनावट पोलीस खटले दाखल करणे यांचा समावेश आहे.

**बॅडमिंटन**

भारतीय बॅडमिंटनपटू देविका सिहाग हिनं थायलंड मास्टर्स बॅडमिंटन स्पर्धेत महिला एकेरीच्या अंतिम फेरीत प्रवेश केला आहे. काल झालेल्या उपांत्य सामन्यात देविकानं चायनीज तैपेईच्या हुआंग यू सुन हिचा 22-20, 21-13 अशा सरळ गेम्समध्ये पराभव केला.

**टेनिस**

ऑस्ट्रेलियन ओपन टेनिस स्पर्धेतलं महिला एकेरीचं विजेतेपद एलेना रिबाकिना हिला मिळालं आहे. काल झालेल्या अंतिम फेरीच्या सामान्यात तिनं आर्यना सबालेन्कावर 6-4, 4-6, 6-4 अशा सेटसमध्ये विजय मिळवला. पुरुष एकेरीचा अंतिम सामना आज नोवाक जोकोविच आणि कार्लोस अल्कराझ यांच्यात होणार आहे.

**क्रिकेट-पूल-प्रशांत**

भारत आणि न्यूझीलंड यांच्यातील पाच सामन्यांच्या मालिकेतील वीस षटकांच्या अंतिम  सामन्यात भारताने न्यूझीलंडचा 46 धावांनी पराभव करत ही मालिका 4-1 अशी जिंकली.   प्रथम फलंदाजी करत भारताने २७१ धावा केल्या. इशान किशनने 43 चेंडूत 103 तर कर्णधार सूर्यकुमार यादवने ६३ धावांचे योगदान दिले. प्रत्युत्तरादाखल न्यूझीलंडचा संघ २२५ धावांवर संपला. सलामीवीर फिन ॲलनने ३८ चेंडूत ८० धावांची खेळी केली. भारताकडून अर्शदीप सिंगने पाच बळी घेतले, तर अक्षर पटेलने तीन बळी मिळवले. इशान किशनला सामनावीर तर सूर्यकुमार यादवला मालिकावीर पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

शेवटी पुन्हा ठळक बातम्या

- अर्थमंत्री निर्मला सीतारामन आज लोकसभेत २०२६-२७ या वर्षासाठीचा केंद्रीय अर्थसंकल्प सादर करणार

- द्वितीय भारत-अरब परराष्ट्र मंत्र्यांच्या बैठकीत परस्पर हिताच्या मुद्द्यांवर चर्चा; प्रादेशिक शांतता आणि स्थिरतेमध्ये अरब लीगच्या भूमिकेचे पंतप्रधानांद्वारे कौतुक.

- ऑस्ट्रेलियन खुल्या टेनिस स्पर्धेत महिला एकेरीमध्ये एलेना रिबाकिना अजिंक्य

आणि

- न्यूझीलंडविरुद्ध वीस षटकांच्या मालिकेत भारताचा 4-1 असा विजय.

**याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं. नमस्कार.**